श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>जाहिर दरपत्रक</u>

दि २३/१० २०२३

**विषय :–**शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेले जार पुरवठा करणेबाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे वतीने यात्रा कालावधी मध्ये दर्शनरांगेतील भाविकांसाठी शुध्द व थंड पिण्याचे पाण्याची सोय केली जाते. याकरीता सन २०२३–२४ साठी शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेले जार पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपलेकडील छापील बिलावर सही व शिक्क्यासह दरपत्रक दि.३१ /१०/ २०२३ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे.सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

''शुध्द व थंड पिण्याचे पाण्याचे भरलेले जार पुरवठा कामाचे दरपत्रक''

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल कमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

स्वा/–
व्यवस्थापक,
श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with Oken Scanner

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. नमूना दरपत्रक कार्यालयीन वेळेत श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पंढरपूर येथे व www.vitthalrukminimandir.orgया संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक दि.31/10 २०२३ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत समक्ष श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले व अपूर्ण दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

२. दरपत्रकासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, व्यवसाय परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही. तसेच संबंधित प्राधिकारी यांचे नजीकचे कालावधीत पाणी नमुना तपासणीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात नमुद पाण्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा.शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

४. निविदा शुल्क रक्कम रू.३४००/–राहिल तसेच दरपत्रक अर्जा सोबत बयाना रक्कम रू. १७,०००/–जमा करावी लागेल.तसेच दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल,त्यांनी पुरवठा आदेश मुल्याचे ३% सुरक्षाठेव जमा करावी लागेल.दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेले आहे त्यांनी रक्कम रूपये १००/– चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे.

५. पुरवठादाराने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराने पुरवठा आदेश दिले पासुन एक वर्षाचे कालावधीसाठी इकडील मागणीप्रमाणे शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणे आवश्यक आहे.

६. पुरवठा करावयाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल |
|---|
| शुध्द व थंड पाण्याने भरलेला जार (१८ लिटर) |

७. मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही. निविदाधारकाने शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या मालाची सुरक्षा अनामत रक्कम समिती खाती जमा करणेत येईल. त्याबाबत समिती व्यवस्थापन निर्णय घेईल.

८. थंड पाण्याने भरलेल्या जारची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा करते वेळी त्याची शासकीय तपासणी करूनच त्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधन कारक रहिल.

Scanned with Oken Scanner

९. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतांत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१०. पुरविण्यात येणारे पाणी खराब असल्याचे आढळून आलेस, त्याबाबतची तपासणी करून खात्री केल्यानंतर पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

११. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१२. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१३. जार पुरवठा करणेचे ठिकाण श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर, श्री. संत तुकाराम भवन, श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, वेदांता भक्तनिवास, व्हिडीओकॉन भक्तनिवास, एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर शहर व परिसरातील परिवार देवतां मंदिरे, पदस्पर्शदर्शनरांगेत एकविरा देवी मंदिरते पत्राशेड ते गोपाळपूर रोड येथे करणे आवश्यक आहे.

१४. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१५. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहतील.

१६. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रू.१००/- चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

स्वा/-

व्यवस्थापक,

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर.

Scanned with Oken Scanner

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## दरपत्रक अर्ज

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषयः— शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेला जार पुरवठा करणेकामी दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.________________________________

पूर्ण पत्ता :— ________________________________

________________________________

मोबाईल कं.:— ________________________________

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेला जार पुरवठा कामाची श्री.संत तुकाराम भवन येथील सुचना फलकावर प्रसिध्द झालेल्या निविदे प्रमाणे दरपत्रक खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| तपशील | दर |
|---|---|
| शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेला जार (१८ लिटर) | |

वरील दरा प्रमाणे शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेला जार पुरवठा करणेस मी तयार आहे.

दिनांक /१०/२०२३ पुरवठाधारकाची सही व शिक्का

**सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत**

१. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. मतदान कार्ड व आधारकार्ड)
२. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना.
३. पॅन कार्ड.
४. निविदा शुल्क,बयाना रक्कम रोखीने भरलेलेची जमा पावती.
५. यापूर्वी शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याने भरलेला जार पुरवठा केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.

Scanned with Oken Scanner